दिनांक ०६/०२/२०१६

# प्रेस नोट

दिनांक ०६/०२/२०१६ रोजी खडकी येथील लोहमार्ग पोलीस मुख्यालयामध्ये मा. श्री डी. कनकरत्नम अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली पुणे लोहमार्ग जिल्हयातील पोलीस मित्र सभासदांचा मेळावा घेण्यात आला.

पुणे, दौंड, अहमदनगर, कुर्डुवाडी, सोलापूर व मिरज लोहमार्ग पोलीस ठाणे हद्दीतील जवळपास २५० पोलीस मित्र या कार्यक्रमास उपस्थित होते. तसेचे पुणे लोहमार्ग जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. विश्व पानसरे व इतर वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी त्याचप्रमाणे पुणे महानगरपालीकेच्या प्रभाग ६ च्या मा. नगरसेवीका श्रीमती अर्चना कांबळे याही उपस्थित होत्या.

महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक यांनी पोलीसांना आपल्या दैनंदिन कर्तव्यामध्ये पोलीस मित्रांचे योगदान वाढविण्याबाबत केलेल्या सुचनांच्या अनुषंगाने सदरचा मेळावा घेण्यात आला. पोलीस अधीक्षक श्री. विश्व पानसरे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लोहमार्ग जिल्हयातील पोलीस मित्रांची संख्या १७० वरून ३८९ एवढी झालेली आहे.

सदर कार्यक्रमामध्ये सर्व पोलीस मित्रांना त्यांचेकडून पोलीसांना कशाप्रकारे मदतीची अपेक्षा आहे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पोलीस मित्रांनीही त्यांच्या समस्या सांगुन पोलीसांना आवश्यक ती सर्व मदत करण्याचे आश्वासन दिले.

